# राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे
## महाराष्ट्र राज्य

| | | |
|---|---|---|
| **अतिरिक्त संचालक**<br>दूरध्वनी क्रमांक (वै) -<br>कार्यालय दूरध्वनी क्र. - | २६०५८९९६ (वै)<br>२६०५८७३९ (का)<br>२६०५८१३९ (का)<br>२६०५८४७६ (का) | अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटूंब कल्याण, मातावाल संगोपन व शालेय आरोग्य, कुटूंब कल्याण भवन, राजाबहादूर मिलरोड, रेल्वेस्टेशनच्या मागे, पुणे ४११ ००१. फॅक्स नं.- ०२० - २६०५८७६६ / २६०५८२१८ / २६०५८१०९<br>Email ID : spm.pune1@gmail.com |
| **आरोग्य सेवा** | | जा.क्र.राकुकका/बाल आरोग्य-१५(क)/ CDR मार्गदर्शक सूचना/ ५३६८८-१०८ /२०१८<br>दि.१६/९/२०१८. |

प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद,............ (सर्व)

२) जिल्हा शल्य चिकित्सक
जिल्हा रुग्णालय,......... (सर्व)

३) वैद्यकीय आरोग्य अधिकारी,
महानगरपालिका........... (सर्व)

**विषय :- बालमृत्यू अन्वेषण प्रशिक्षणाबाबतच्या मार्गदर्शक सूचना सन २०१८ -१९**

**संदर्भ :-** या कार्यालयाच्या बाल मृत्यू अन्वेषणच्या कार्यक्रमाच्या दि.१९.५.२०१८ रोजीच्या सुधारित मार्गदर्शक सूचना

बालमृत्यू दर कमी करणे हे राष्ट्रीय आरोग्य अभियानांचे एक महत्वाचे उद्दिष्ट आहे. राज्यामध्ये होणाऱ्या अर्भकांच्या व बालकांच्या मृत्यूच्या कारणांचा शोध घेण्याच्या दृष्टीने तसेच भविष्यात होणारे बालमृत्यू टाळण्याकरिता नियोजन करण्याच्या दृष्टीने शासनामार्फत गेल्या काही वर्षापासून बालमृत्यूंचे अन्वेषण करणे ही योजना राबविण्यात येत आहे. त्याच धर्तीवर सन २०१५-१६ पासून ही योजना राज्यातील सर्व जिल्हयातील प्रत्येक तालुक्यामध्ये राबविण्यात येत आहे. त्याबाबत सुधारीत मार्गदर्शक सूचना आपणास संदर्भिय पत्रानुसार देण्यात आलेल्या आहेत.

त्यानुसार सर्व जिल्हयांत बाल मृत्यू अन्वेषण कार्यक्रमाची अंमलबजावणी करावयाची आहे. सदर कार्यक्रमासाठी सर्व स्तरावरील कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण होणे. गरजेचे आहे. यासाठी सन २०१८-१९ च्या मंजुर पीआयपी मध्ये एफएमआर कोड ९.५.२.४ अंतर्गत बालमृत्यू अन्वेषणाच्या प्रशिक्षणासाठी अनुदान मंजुर आलेले आहे. त्यानुसार प्रति जिल्हा व महानगरपालिका रु.५०,००० प्रमाणे तसेच प्रति तालुका रु.१५००० प्रमाणे अनुदान वितरित करण्यात आलेले आहेत.

प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण, प्रशिक्षण केंद्र यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व जिल्हयातील अधिकारी व कर्मचारी यांना बालमृत्यू अन्वेषणाबाबतचे प्रशिक्षण द्यावे. यामध्ये वैदयकिय अधिकारी जिल्हा प्रशिक्षण केंद्र, डीआरसीएचओ व निवासी वैद्यकिय अधिकारी (बाहयसंपर्क) यांचाही सहभाग घ्यावा. त्यानुसार सर्व जिल्हयांत जिल्हास्तरीय प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात यावीत. या प्रशिक्षण सत्रांसाठी जिहयातील रुग्णालयांचे वैद्यकिय अधिक्षक व १ वैद्यकिय अधिकारी, इन्चार्ज सिस्टर, जिल्हा आशा समूह संघटक, वैद्यकिय अधिकारी जिल्हा प्रशिक्षण पथक, तालुका वैद्यकिय अधिकारी, जिल्हा आरोग्य परिचारीका यांचे प्रशिक्षण घेण्यात यावे.

सदर सत्रामध्ये प्रशिक्षित झालेल्या अधिकारी यांनी आपल्या तालुक्यातील आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घ्यावे. तालुका स्तरीय प्रशिक्षण सत्रामध्ये सर्व सर्व वैद्यकिय अधिकारी प्रा.आ.केंद्र,ए.एन.एम व आशा कार्यकर्ती यांचे प्रशिक्षण

घ्यावे. तसेच शहरी भागातील प्रशिक्षण सत्रांमध्ये सर्व वैद्यकिय अधिकारी, एएनएम हेल्थ पोस्ट व लिंक वर्कर यांचे प्रशिक्षण घ्यावे. सदर प्रशिक्षणासाठी केंद्र शासनाच्या बालमृत्यू अन्वेषणाच्या मार्गदर्शक सूचनांचा व संदर्भीय पत्रनुसार बालमृत्यू अन्वेषणाच्या दिलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करावा. तसेच प्रत्येक प्रशिक्षण सत्रासाठी दिलेल्या अनुदानानुसारच खर्च करण्यात यावा.

सदर सत्रांमध्ये बालमृत्यू अन्वेषणाचे अहवाल अचुक भरणे, बालमृत्यूंची अहवालामध्ये होणारी पुनरावृत्ती टाळणे, अन्वेषण व मुल्यमापन करुन योग्य अहवाल राज्यस्तरावर पाठविणेबाबत सविस्तर मार्गदर्शन देण्यात यावे. सदर कार्यक्रमाची उकृष्टरित्या अंमलबजावणी होईल याबाबत कार्यवाही करावी. प्राचार्य,आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र यांनी जिल्हा व महानगरपालिकास्तरावरील प्रशिक्षण सत्रांसाठीचे वेळापत्रक तयार करावे आणि तालुकास्तरावरील प्रशिक्षण सत्रांसाठीसुदधा समन्वय साधावा. सदर प्रशिक्षण सत्रांसाठीचे वेळापत्रक या कार्यालयास पाठवावे.

तरी वरील दिलेल्या सुचनांनुसार आवश्यक कार्यवाही करुन बालमृत्यू अन्वेषणाचे प्रशिक्षण पूर्ण करावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा,**
**कुटूंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे १.**

**प्रत योग्य त्या कार्यावाहीसाठी :**

- उपसंचालक, आरोग्य सेवा, प्रभारी मंडळे .......... (सर्व)
- प्राचार्य, आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, ...... (सर्व)

**प्रत सविनय सादरः-**

१) मा.संचालक आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२) मा.आयुक्त, आरोग्य सेवा (कुक) व संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.